Shivaji College Hingoli
Dist. Hingoli

National Conference

On

# Impact of Globalisation on Political, Socio-Economic and Liberal Democracy in India

*(28th & 29th Sept. 2018)*

**Sponsored By**

Indian Council of Social Science Research

**Originized By**

**Department of Political Science**

**Ujwal Gramin Mahavdyalaya, Ghonsi, Tq- Jalkot , Dist.Latur**



**Editor**

**Prin. Dr. Sadanand H. Gone**

**Dr. Dayanand M. Gudewar**

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

Shivaji College Hingoli

# DECLARATION BY THE PUBLISHER

ISBN- 978-93-83672-75-2

**PUBLISHED AT**
Ujwal Gramin Mahavidalaya, Ghonsi, Tq.-Jalkot. Dist. Latur

**PUBLISHER**
Shaurya Publication,
Kapil Nagar, Khadgaon Road, Latur, Dist. Latur
Vistit- www.rjournals.co.in Email: hitechresearch11@gmail.com

**EDITORS**
Prin. Dr. Sadanand H. Gone
Dr. Dayanand M. Gudewar

**COVER DESIGNING**
**Arun Godam**

**PRINTING**
R.R. Graphics , MIDC, Latur

Views, idea and materials published in this ISBN Book are intellectual properties of author (s). Author(s) is/ are solely responsible for their publication and not the Editors, Principal or publisher.

© All right are reserved. No part of this publication may be reproduced, stored, retrieved or transmitted in any form, by any means, without the written permission from the Principal, **Dr. Sadanand H. Gone** Ujwal Gramin Mahavdyalaya, Ghonsi, Tq- Jalkot , Dist.Latur

**28th September 2018**

**Prin. Dr. Sadanand H. Gone**

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

जागतिकीकरणाचे सामाजिक चळवळीवरील परिणाम
प्रा. डॉ. शामराव महादेव लेंडवे
२८. जागतिकीकरण आणि उच्च शिक्षण
डॉ. सुनिल विश्वनाथराव शिंदे , संतोष बालासाहेब कोल्हे
२९. जागतिकीकरणाचा नकारात्मक पैलू
प्रा. ज्ञानेश्वर बनसोड, डॉ. महादेव गव्हाणे
३०. जागतीकीकरण आणि भारताची वाटचाल
डॉ. संतराम प्रभाकर मुंढे
३१. भारत आणि जागतिकीकरण
प्रा. डॉ. बोरोळे रजनी अनंतराव
३२. जागतिकीकरण : ग्रामसंस्कृती व मराठी साहित्य
डॉ. सूर्यवंशी दिपक सुभाषराव २००
३३. जागतिकीकरणाचा कृषी क्षेत्रावरील परिणाम - एक अभ्यास
प्रा.डॉ.सुखनंदन ढाले २०६
३४. खाउजा संस्कृती मधील शेतकरी आत्महत्या
प्रा.डॉ.रामदिनेवार गोविंद शंकरराव २१८
३५. भारतीय समाज आणि जागतिकीकरण
प्रा. डॉ. घायाळ एस. पी. २२३
३६. जागतिकीकरण आणि उदारमतवादी लोकशाही
प्रा.डॉ. एस.एम. कोनाळे २३१
३७. जागतिकीकरण आणि रोजगार
डॉ. स्मिता काशिनाथराव मरवाळीकर २३६
३८. जागतिकीकरण व भारतातील उच्च शिक्षण
प्रा.घटकार आर.व्ही. २३९
३९. जीएसटी:- एक देश एक कर
प्रा. काळे गोविंद रामराव २४४
४०. जागतिकीकरणाचे भा...

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli
Scanned with OKEN Scanner

 ISBN- 978-93-83672-75-2

३३.

# जागतिकीकरणाचा कृषी क्षेत्रावरील परिणाम - एक अभ्यास

प्रा.डॉ.सुखनंदन ढाले
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली*

---

## प्रस्तावना

औद्योगिक क्रांतीनंतर उद्योगप्रधान युरोपिय राष्ट्रांनी व्यापाराच्या निमित्ताने जगभर आपल्या वसाहती स्थापन केल्या. वसाहतीच्या शोषणातून या राष्ट्राची प्रचंड भरभराट झाली मात्र गरीब व अविकसित राष्ट्रांची परिस्थिती कमालीची खालावली. पाश्चात्य शिक्षण व ज्ञानाच्या प्रसारानंतर शोषित राष्ट्राच्या जनतेत राजकीय जागृती येऊन स्वातंत्र्य आंदोलनाला चालना मिळाली. परिणामी दूसऱ्या महायुद्धानंतर अनेक वसाहती स्वातंत्र्य झाल्या. यामुळे पाश्चात्य साम्राज्य लयाला गेली. परंतू सोव्हिएट रशियाचा एक महाशक्ती म्हणून दूसऱ्या महायुद्धानंतर उदय झाला व जगाची विभागणी दोन गटात झाली. यामधून जागतिक राजकारणात शस्त्रास्त्र स्पर्धेला सुरूवात होऊन शस्त्रास्त्र निर्मितीचा प्रचंड नफा देणारा व्यवसाय प्रगत राष्ट्रांना मिळाला. परंतू काही काळानंतर रशियाच्या विघटनानंतर हे पर्व संपले. प्रगत राष्ट्रांच्या बाजारपेठा मर्यादित होत्या म्हणून देशांतर्गत मागणी एका मर्यादेच्या पलिकडे वाढणे शक्य नव्हते. तसेच जपान, कोरिया, चीन इत्यादी आशियातील राष्ट्रांनी पाश्चात्य राष्ट्रांसमोर आर्थिक आव्हाने उभी करण्यास सुरूवात केली होती. त्यामुळे विकसित राष्ट्रात बेकारीचा प्रश्न उद्‌भवू लागला. प्रगत राष्ट्राच्या भांडवल वापरावर मर्यादा येऊन अतिरिक्त भांडवलाचा प्रश्न निर्माण झाला होता. यामधून मार्ग काढण्यासाठी प्रगत राष्ट्रानी भांडवलाचा मुक्तसंचार आणि बाजारपेठांचा विस्तार या दोन बाजू नजरेसमोर ठेऊन जागतिकीकरणाचे धोरण पुढे आणले. जागतिकीकरणाच्या धोरणाचा आराखडा डंकेल प्रस्तावातून मांडण्यात आला.

## उद्दिष्टे

१) जागतिकीकरणाची प्रक्रिया समजुन घेणे.

२) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे कृषीक्षेत्रावरील परीणाम अभ्यासणे.

## जागतिकीकरणाचा अर्थ

जागतिकीकरणाची प्रक्रिया जगातील सर्व देशात सुरू आहे. ही एक बहुआयामी प्रक्रिया आहे. मुलतः जागतिकीकरण आर्थिक क्षेत्रातील परिवर्तनाशी संबंधित प्रक्रिया असली तरी या

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli



Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-83672-75-2

प्रक्रियेने संपूर्ण समाज जीवन ढवळून निघाले आहे. त्यामुळे जागतिकीकरण म्हणजे जगाच्या आर्थिक उत्क्रांतीची परमावधी असे मानले जाऊ लागले. राष्ट्रा-राष्ट्रातील संबंधात एका परिवर्तनाचा व नवयुगाचा प्रारंभ होउन ग्लोबल व्हिलेज (Global Village) ही संकल्पना रुढ झाली आहे.[१]

श्री. बदी व बदी यांच्या मते,"जागतिकीकरण म्हणजे व्यापार किंवा आर्थिकदृष्टया संपूर्ण विश्वात चालणे होय. त्यांना प्रदेश व राष्ट्राच्या मर्यादा नसतात. एक प्रकारे जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्मतेची ती प्रक्रिया असते."[२]

दिपक नय्यर यांच्या मते, "जागतिकीकरण म्हणजे राष्ट्र, राज्याच्या राजकीय सीमा ओलांडून विस्तारित झालेले आर्थिक क्रियाकलाप होय."[३]

## जागतिकीकरणाचे स्वरूप

जागतिकीकरणाची ही प्रक्रिया आर्थिक परिणामांबरोबरच राजकीय क्षेत्रातही मुलभूत बदल करणारी आहे. जागतिकीकरणातून राष्ट्र ही संकल्पना लोप पावत असल्याचे दिसून येत आहे. कारण एकाच राष्ट्रात अनेक राष्ट्रांच्या हितसंबंधांचा परिणाम राजकीय निर्णयपध्दतीवर होऊ शकेल. यात त्या राष्ट्रांचे मुलतः हितसंबंध जोपासणारे आपला प्रभाव फार मोठया प्रमाणात पाडू शकणार नाहीत. राजकीयदृष्टया ही प्रक्रिया विकसनशील देशांना अधिक गुंतगुंतीची त्रासदायक ठरेल. विकसनशील देशात गुंतागुंतीच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रश्नांची जाणीव ठेऊन निर्णय घेण्याची कुवत राजकीय नेतृत्वात कितपत असेल यावरच जागतिकीकरणाचे परिणाम निर्धारित होतील.

## जागतिकीकरण आणि भारत

१९९१ मध्ये भारत सरकारने जागतिकीकरणाचा स्वीकार करून नवे आर्थिक धोरण जाहीर केले. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण ही या नवीन आर्थिक धोरणाची वैशिष्ट्ये होती. या धोरणाद्वारे भारतात नवीन आर्थिक युगाचा प्रारंभ झाला. पंडीत नेहरूच्या काळात भारताची अर्थव्यवस्था नियंत्रित होती. पंचवार्षिक योजना पुर्ण शक्तीनिशी राबविल्या जात होत्या. परंतु नव्या आर्थिक धोरणामुळे नियंत्रित अर्थव्यवस्थेची जागा संघात्मक अर्थव्यवस्थेने घेतली. यामुळे भारतातील कृषि, शिक्षण, विज्ञान, औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्र यामध्ये परकीय गुंतवणूकीस सुरूवात झाली. याचा सर्वाधिक परीणाम कृषी क्षेत्रावर झाला आहे.


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

भारत आणि गॅट करार

आंतरराष्ट्रीय व्यापारात वृद्धी व्हावी म्हणून १९४९ मध्ये जिनेव्हा येथे गॅट हा एक सामान्य बहूपक्षीय करार करण्यात आला.[४] सुरूवातीला २३ राष्ट्रे या करारात सहभागी झाली पुढे ही संख्या वाढत गेली आणि आज ती संख्या शंभराच्या बरीच वर आहे. १९८६ मध्ये उरूग्वे येथे गॅट कराराची व्याप्ती वाढवून कृषी उत्पादन, बौद्धिक मालमत्तेवरील हक्क, सेवाव्यवहार, गुंतवणूक या विषयाचा समावेश केला गेला. येथूनच खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. उदारीकरण व खाजगीकरण या दोन्ही संकल्पना जागतिकीकरणाचा मुख्य आधार ठरल्या आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील उदारीकरण ही पहिली पायरी आहे.

जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) माध्यमातून १९९५ मध्ये डंकेल प्रस्तावामध्ये प्रथमच शेती आणि शेतीव्यापार यांचा समावेश केल्यामुळे जागतिक व्यापार संघटनेच्या सभासद देशांनी सारखे जकातेत्तर निर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापारावरून काढून टाकणे, शेतीमालाच्या किमती ठरवितांना उत्पादन खर्च व इतर अडथळे दूर करणे, शेतीमालाच्या निर्यातीला प्रत्यक्ष दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्यात कपात करणे, याचबरोबर बौध्दिक संपदा यासारखे अधिकार मान्य केले आहेत. ऑर्थर डंकेलने अतिशय काळजीपूर्वक भाषा वापरून खुल्या बंधमुक्त, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा जवळपास ४५० पानांचा मसुदा तयार केला. हा मसुदा जसा आहे तसा कोणतेही बदल न करता स्विकारला पाहिजे, त्यासंबंधी आता कोणत्याही वाटाघाटी नाहीत आणि जर तो मान्य नसेल तर गॅटचे सदस्यत्व सोडावे लागेल असा अंतिम इशारा दिला. १५ डिसेंबर १९९३ ला डंकेल प्रस्तावाला सचिव पातळीवर मान्यता दिलेली आहे.[५] या डंकेल प्रस्तावातील तरतुदी अशा होत्या

१) वनस्पर्तींच्या नवीन जातीवर वनस्पती पैदासदारांचे हक्क

२) सूक्ष्म जीवावरील बौध्दिक संपदेचे हक्क,

३) सूक्ष्म जीवशास्त्राच्या प्रतिक्रियावरील बौध्दिक संपदेचे हक्क.[६]

भारतात आर्थिक सुधारणा व डंकेल प्रस्ताव मान्य केल्याने देशाच्या प्रत्येक अर्थसंकल्पात शेती, जलसिंचन, ग्रामीण विकास आणि खतावरील अनुदाने या सर्व बाबींवरील जी. डी. पी. च्या प्रमाणातील एकूण खर्चात (योजनांतर्गत आणि योजनाबाह्य) सातत्याने घट झालेली दिसून येते. एकूणच या सर्व गॅट कराराच्या जाचक अटींमुळे भारतीय शेतकरी पूर्णतः गुलामगिरीकडे लोटला जात असल्याचे दिसते. जागतिकीकरणाचे शेतकऱ्यावरील झालेले परिणाम

भारत का कृषीप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आजही शेतीच आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हा देशातील ६९ % लोकसंख्या शेतीवर अवलंबून होती. गेल्या ६८ वर्षात

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

ISBN- 978-93-83672-75-2

देशाची लोकसंख्या तिपटीने वाढुनही आज सुमारे ६५ % लोकसंख्या शेती क्षेत्रावरचं उदरनिर्वाहासाठी अवलंबून आहे. भारतात जेव्हा जागतिकीकरण आणि उदारीकरणाची जागतिक लाट आली तेव्हा शेतीची एकूण अवस्था पाहता १२५ करोड लोकसंख्येला रोजी रोटी पुरविणाऱ्या शेतीसाठी शासनाने पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून अपेक्षित खर्च केलेला नाही.[६] यामुळे वीज, पाणी, खते, पतपुरवठा, कृषी मालावर प्रक्रिया करण्यासाठी छोट्या-मोठ्या कारखान्यांची उभारणी, कृषी मालाच्या विक्रीची व्यवस्था, शीतगृहे, गोदामे, गावागावांतून फिरणारा भाजीपाला इत्यादी नाशवंत वस्तुंची ने-आण करण्यास सार्वजनिक क्षेत्रात जी गुंतवणूक करण्याची गरज होती ती प्रत्येक पंचवार्षिक योजनेच्या काळात दुर्लक्षित करण्यात आली.

**बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शेती क्षेत्रात शिरकाव**

जागतिकीकरणाच्या अंमलबजावणीमुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेमध्ये शिरकाव केलेला आहे. यामधील कारगील सीडस, बेजो शितल सीडस्, सँडोज, पायोनियर, ओव्हर साईज, कार्पोरेशन, आय. टी. सी., ॲग्रोटेक, हिंदुस्थान लिव्हर यासारख्या बहुराष्ट्रीय कंपन्या शेतीसाठी लागणाऱ्या बी-बियाणांच्या बाजारात उतरल्या आहेत. एवढेच नव्हे तर अमेरिकेतील कारगिल कॉन्टीनेन्टल ग्रेन आणि युरोपमधील तीन मोठया कंपन्या अशा एकूण पाच कंपन्यांच्या हाती जगातला ८० % धान्यबाजार आहे. या कंपन्यांची अर्थक्षमता एवढी आहे की, कोणत्याही देशातील लोकप्रतिनिधी आणि शासनकर्त्यांना त्या खरेदी करू शकतील असे बोलले जाते.[७] बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात भक्कम पाय रोवले आहेत. मुक्त आयातीच्या धोरणांचे दुष्परिणाम जे सामान्य माणसाला कळतात ते राज्यकर्त्यांना कळत नाही असे म्हटले तर ती अतिशयोक्तीच म्हणावी लागेल. देशातील शेतकऱ्यांनी पिकविलेले धान्य आणि धान्य पदार्थ, गहु आणि पीठ, मका, सोयाबीन तेल, तेलबिया, तेल, पेंड, चरबी, तंबाखू इतक्या वस्तू जगात निर्यात करण्यामध्ये अमेरिकेचा पहिला क्रमांक असल्याने शेतीमालाचा व्यापार करणारा जगातील सर्वात मोठा देश म्हणून अमेरिकेकडे पाहिले जाते. पेप्सी आणि कारगिल या अमेरिकेतील बलाढ्य कंपन्यांनी पंजाब व गुजरातच्या सरकारबरोबर करार केले आहेत. या कराराप्रमाणे ते आता शेतकऱ्याबरोबर कंत्राटी पध्दतीने शेती करू शकतात तसेच बी-बियाणे व गोदामे उपलब्ध करून देऊ शकतात.

अमेरिकेच्या फॉर्च्युन मासिकात नमुद केलेल्या ५०० बलाढ्य कंपन्यांचा आर्थिक व्यवहार १४ हजार अब्ज डॉलर इतका आहे. संपूर्ण जगात विकलेल्या वस्तुंच्या व सेवांच्या मुल्यांपैकी ८० % भाग त्यांच्या अखत्यारित आहे. जगातील सर्वात बलाढ्य १०० आर्थिक शक्तींमध्ये ५१



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli, Dist. Hingoli
Scanned with OKEN Scanner

 ISBN- 978-93-83672-75-2

बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत तर ४९ देश आहेत.[८] म्हणजेच अनेक राष्ट्रांच्या आर्थिक शक्तीपेक्षा बहुराष्ट्रीय कंपन्यांची शक्ती कित्येक पटींनी अधिक आहे. जगातील सर्व राष्ट्रांनी मुक्त बाजारपेठेला पोषक व बहुराष्ट्रीय कंपन्यांना मान्य असलेला आर्थिक कार्यक्रमच राबवावा असा त्यांचा आग्रह आहे.या आर्थिक कार्यक्रमात पुढील बाबींचा त्यांनी समावेश केला.

१) बहुराष्ट्रीय कंपन्यांना उत्पादन व वितरणाचे संपूर्ण स्वातंत्र्य असावे. सर्व प्रकारचे परवाने रद्द करावेत किंवा कमी करावेत. बंधने काढून टाकावीत त्यासाठी कायद्यात किंवा नियमात बदल करावेत.

२) सर्व वस्तुंच्या व सेवांच्या आयात-निर्यातीवर बंधने नसावीत. आयात निर्यात कर कमीत कमी असावेत.

३) बहुराष्ट्रीय कंपनीच्या पेटंटस्वर रॉयल्टी द्यावी. रॉयल्टी न देता उत्पादनतंत्र वापरल्यास जबरदस्त दंड लावावा.

४) गुंतवणूकीवरची सर्व बंधने काढून टाकावित. एतदेशियांना उत्पादनाबरोबर तंत्रज्ञान द्यावे, एतदेशीय कंपन्यांचा सहभाग असावा. उत्पादनाचा विशिष्ट भाग निर्यात करावा.

५) एतदेशीय कारखानदारांना कोणतेही विशेष संरक्षण देऊ नये.

६) सर्व नैसर्गिक संपत्ती भूमी, जल, वन बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादनाला उपलब्ध असाव्यात.

७) पर्यावरण रक्षणाचे किंवा मजूरांच्या संरक्षणाचे कायदे शिथील करावेत.

८) बहुराष्ट्रीय कंपन्यांविरूध्द विरोधात्मक मोर्चे निघाल्यास बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या संपत्तीला व व्यवस्थापन वर्गाला पोलीस संरक्षण द्यावे. त्याचा खर्च बहुराष्ट्रीय कंपन्यांना द्यावा लागू नये.[९]

आर्थिक सुधारणेच्या नावाने लादलेल्या अशा प्रकारच्या नवसाम्राज्यवादी अटींनी भारतीय शेतकरी आणि कामगार आजच्या परिस्थितीत बेदखल झालेला दिसून येतो. सन १९९८-९९ मधील रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या चलन आणि वित्त अहवालात नमुद करण्यात आले आहे की, खाजगी क्षेत्राच्या गुंतवणुकीचा बहुतांश भाग अल्पकालीन उत्पादकता वाढविण्यासाठी वापरला जातो. दिर्घकालीन मालमत्तेची निर्मिती करण्यासाठी नाही. यात स्पष्टपणे असेही निदर्शनास आले आहे की, शेतीच्या विकासाचे सातत्य निर्णायकपणे सार्वजनिक गुंतवणूकीवर अवलंबून असते. गेल्या कित्येक वर्षापासून शेती क्षेत्रातील घटत्या सार्वजनिक गुंतवणूकीचे भारतीय शेतीवर आणि शेतकऱ्यांवर विपरित परिणाम झालेले आहेत. याचबरोबर जागतिक

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli Dist. Hingoli



Scanned with OKEN Scanner

 ISBN- 978-93-83672-75-2

व्यापार संघटनेचे कार्यवाह मायकेल सुर यांनी विकसित देश त्यांच्या शेतीला ग्रीन बॉक्स, ब्लू बॉक्स, अंबर बॉक्स या नावाने दरदिवशी किमान १०० कोटी डॉलर्सचे अनुदान देतात. यातील विशेष बाब म्हणजे केंद्र सरकारने १९९१ नंतर पाणी, खते, वीज इत्यादीकरीता शेतकऱ्यांना दिली जाणारी अनुदाने (सबसिडी) कमी केली आहेत. याउलट विकसित देश जागतिक व्यापार संघटनेच्या अटींना भुलून अनेक मार्गांनी स्वतःच्या देशातील कृषी क्षेत्राला सबसीडी देत असतात. यामुळे भारतीय शेती, शेतकरी, शेतमजूर संकटात सापडले आहेत. याबाबतीत `दि इकॉलॉजिस्ट` चे संस्थापक संपादक आणि पर्यावरण चळवळीतील धडाडीचे नेते `एडवर्ड गोल्डस्मिथ` यांनी म्हटले आहे की,`भारतातील दोन-तीन एकरापेक्षा कमी जमीन असलेले शेतकरी जागतिकीकरणात कसे काय टिकु शकतील. ते सर्व शहरामधल्या झोपडपट्ट्यांकडे ढकलले जातील आणि तुमचे छोटे दुकानदार, विक्रेते आणि बलुतेदार लोकही उखडले जाण्याची शक्यता आहे. कारण त्यांचे अस्तित्वच मुळी शेतकऱ्यांवर अवलंबून आहे. अशा तऱ्हेने जागतिकीकरणाचे चालक भारतातील ६० ते ७० कोटी लोकांना देशोधडीला लावतील आणि कंगाल बनवतील.`[१०] जागतिकीकरणाचा विपरित परिणाम केवळ शेती आणि शेतीमालावरच होणार असे नाही. तर प्रामुख्याने शेतीवर जगणाऱ्या भारतीय समाजावर झालेला आहे. यामुळे भारतीय शेतीच्या समस्या कमी होण्याऐवजी अधिक तीव्र होत आहेत. जो शेतीमाल देखील या देशात मुबलक प्रमाणावर पिकतो तो शेतीमाल या देशात खुलेआम बाहेरून येत राहिल्याने या देशातल्या शेतीवर अवलंबून असणारे छोटे शेतकरी, कामगार व त्यांची कुटूंबे यांच्या भवितव्याचा प्रश्न बिकट झाला आहे. भारतीय शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ मिळणे तर दुरच पण स्वतःची हक्काची भारतीय बाजारपेठ मिळणे अशक्य झाले आहे. इ. स. १६०० मध्ये भारतात आलेल्या एका इस्ट इंडिया कंपनीने व्यापार करण्याऐवजी राजकीय वर्चस्व निर्माण केले. आज तेच बहुराष्ट्रीय कंपन्यांना सवलती देऊन भांडवल गुंतवणुकी करीता बोलविण्यात येत आहे. त्यांच्या परिणामाची जाणीव देशातील राज्यकर्त्यांना अजूनही झाली नाही. ही जागतिकीकरणाची कुटील करणी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा भारतीय राजकीय व्यवस्थेसमोरील एक ज्वलंत समस्येचा विषय झालेला आहे. तितकाच तातडीचा, वादग्रस्त व कृती कार्यक्रमाचा आहे. प्रामुख्याने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे समाजात सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक बदल झालेले दिसून येतात. जागतिकीकरणाने खुली बाजारपेठ व खाजगीकरण यांच्यामार्फत मानवाला

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli, Dist. Hingoli
Scanned with OKEN Scanner

 ISBN 978-93-83672-75-2

[illegible] साधने, [illegible] पर्याय देण्याचे मानवी समाजाचा विकास करण्याचे जरी प्रयत्न [illegible] असले तरी या जागतिकीकरणामुळे जगातील विकसनशील देशात आलेली संकटे शेतकरी व कामगारांना [illegible]च्या खाईत लोटणारी आहेत हे दिसून येत आहे. किंबहुना ही नवीन उदारमतवादी अर्थप्रणाली भारतीय शासन आणि राजकारणाला पर्याय देवू शकणार नाही. कारण आपण 'World Risk Society' मध्ये पदार्पण केले आहे. असे उलरिक बेक म्हणतात. त्यांच्या मताप्रमाणे, नवीन उदारमतवादी अर्थप्रणाली, खूली अर्थव्यवस्था व जागतिकीकरणामध्ये माणसाचे सर्व प्रश्न दुर होतील ही एक घातक भ्रामक कल्पना आहे.[११] जागतिकीकरणाच्या कुटील प्रवृत्तीमुळे भारतीय शेती क्षेत्रावर, अभुतपूर्व अरिष्ट आलेले दिसून येते.

भारतासारख्या समाजवादी विचारप्रणाली स्विकारलेल्या देशाने शोषणमुक्त समाजव्यवस्था निर्माण करण्याऐवजी भांडवलदारी विकासाचा मार्ग जोमाने आक्रमित आहे. या देशात व तिसऱ्या जगातील इतर देशात विकसित होणाऱ्या भांडवलशाहीच्या संदर्भात एक लक्षणीय विरोधाभास दिसतो तो असा की ही भांडवलदारी सर्वसाधारण उत्पादकांवर जे पाशवी शोषण लादत आहे त्यामुळे गेल्या पंधरा वर्षांत भारतात दोन लाखाहून अधिक संख्येने शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी म्हणजे देशाचा स्वाभिमान, देशाचे अस्तित्व आणि राष्ट्राची प्रतिष्ठा असतो कारण तो संबंध मानवी समुदायाचा पोशिंदा आहे. ब्रिटीशांच्या १५० वर्षाच्या राजवटीत जेवढ्या आत्महत्या झाल्या नसतील तेवढ्या १९९१ नंतर झालेल्या आहेत. इ. स. १८६० ते १९०९ या काळात भारतात २२ भीषण दुष्काळ पडले. त्याही परिस्थितीत शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नाहीत. इंग्रजांच्या राजवटीत शेतकऱ्यांचे अपरिमित शोषण झाले असले तरी, नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ अशा भयावह परिस्थिती मात्र जागतिकीकरणाच्या युगात जी झाली तिचे चित्र गंभीर आहे. शेतकरी आत्महत्येच्या अध्ययनातून वेगवेगळया अभ्यासकांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. जी. के. वीरेश कमिटीच्या म्हणण्यानुसार (कर्नाटक सरकार) बहुतांश शेतकरी दारू व मौजमजा करण्यासाठी कर्ज घेतात व त्यामुळे आत्महत्या करतात. इतर अभ्यासातून असे दिसून येते की, शेतकरी मुलीच्या लग्नाच्या कार्यासाठी कर्जबाजारी होतो, त्याच्याकडील शेती ही निसर्गावरच अवलंबून असल्यामुळे तो आत्महत्या करतो, शेतीला लागणाऱ्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. असा निष्कर्ष काढण्यात आला. पण शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाला व आत्महत्येला प्रमुख कारण काय आहे याचा शोध घेणे महत्त्वपूर्ण ठरते.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

 ISBN- 978-93-83672-75-2

Shivaji College Dist Hingoli

शासकीय धोरणातील बदल

राष्ट्रीय कृषी आयोगाचे अध्यक्ष प्रो. एम. एस. स्वामीनाथन यांनी शेतकऱ्यांच्या आतापर्यंत झालेल्या आत्महत्या व यापुढे होणाऱ्या आत्महत्यांना शासनाची धोरणेच जबाबदार आहेत व ती तातडीने बदलली पाहिजेत असा निष्कर्ष काढला आहे. लहान शेतकरी वर्गाला कृषीनिधी मिळायच्या प्रक्रियेमधील मोठया शेतकऱ्यांना वाढत्या राजकीय हस्तक्षेपामुळे शासकीय मदतीचा कसलाच फायदा झाला नाही. उलट सहकारी सोसायट्या, बँका आणि विभागांवर या वरचढ शेतकरी वर्गाचे नियंत्रण असल्यामुळे त्यावर त्यांची मक्तेदारी बनली. परिणामी लहान आणि वंचित शेतकऱ्यावरील कर्जाचे प्रमाण वाढत गेले. त्यामुळे भारतीय शेतकरी हा जागतिक बाजारपेठेतील अमानुष स्पर्धेला बळी पडलेला दिसतो. जागतिकीकरणांमुळे शेतकऱ्यावर आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेचा दबाव वाढत आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींचा कधी नव्हे इतका स्पष्ट परिणाम भारतातील लहान शेतकऱ्यांवर होत आहे.

**शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनीवर विशेष आर्थिक क्षेत्राची उभारणी**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सर्वात जास्त भरडला जाणारा वर्ग आहे तो भारतीय शेतकरी, कारण शेतकऱ्याला दिले जाणारे अनुदान क्रमाने कमी होत आहे. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी भांडवलदारांच्या घशात घालण्याचा डाव राजरोस खेळला जात आहे. कृषी प्रधान देशाचा शेतकरी सरकारच्या अन्यायकारक धोरणामुळे एकाकी पडत चालला आहे. सन २००५ मध्ये भारत सरकारने सेज अधिनियम पारीत केला हा कायदा म्हणजे जागतिकीकरण आणि उदारीकरणाचे अपत्य आहे. याच काळात उद्योग व्यवसाय यांची चलती आहे. त्यातून नवश्रीमंत उद्योगपती, व्यावसायिक यांचा वर्ग नव्याने उदयाला येत आहे. विकसनशील व पाश्चात्य जीवनशैलीचे आकर्षण त्या उद्योजकांना असून नवीन `मॉल संस्कृतीची` भव्य दुकाने व `आय. टी. पार्क` साठी उद्योगसेवा केंद्र पुण्या-मुंबईत-बैंगलोर-हैद्राबाद येथे मोठया प्रमाणात जमिनी संपादू लागले आहेत. राज्यकर्त्याशी जवळीक व प्रोत्साहन यातून असे उद्योगकेंद्रांचे जाळे निर्माण होऊ लागले. याशिवाय, छोटया मोठया शहरात दिल्ली नागपूर-चेन्नई या ठिकाणीही `टेक्नालॉजी पार्क` मध्ये प्रकल्पासाठी मोठया प्रमाणात जागा खरेदी करण्यात येत आहेत. पण या संदर्भात शेतकरी वर्ग आधारहीन होणार असल्याची भूमिका मुळीच घेतली जात नाही. शेतकऱ्यांच्या जमिनी धरणासाठी, कारखान्यांसाठी रस्ते, वाहतूक, रेल्वे तसेच यांच्याशी संबंधित लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी ताब्यात घेण्यात आल्या आहेत. पण या विविध हेतूने घेतलेल्या शेतकऱ्याच्या पुनर्वसनाचे कार्य तथा नुकसान भरपाई त्यांच्या वारसांना नोकरी मिळण्यास केलेली



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-83672-75-2

टाळाटाळ पाहिली तर बऱ्याचशा शेतकरी वर्गाने आपल्या जमिनी कवडीमोल भावाने विकण्यास असमर्थता दर्शवून चळवळी सुरू केल्या.

देशात एक लाख चौतीस हजार एकर जमिनीवर `एस. ई. झेड` चे प्रकल्प राबविले जात आहेत. हे प्रकल्प उभारणाऱ्यांनी विविध करापोटी सरकारला कर रूपाने पैसा देतांना यातील काही रक्कम शैक्षणिक, सामाजिक तथा पुनर्वसन कार्यासाठी वापरण्यास प्राधान्य देण्याऐवजी नफेखोरीच सुरू केली. म्हणजेच राज्याच्या कल्याणकारी धोरणाविरूध्द हे कार्य केले जात आहे. शिवाय मुख्य म्हणजे हवा प्राणी यांचे प्रदुषण त्यामुळे होणारे पिकांचे नुकसान आणि तेथील जनतेचे बिघडलेले आरोग्य, वाढलेले प्रदुषण याविषयी बऱ्याच तक्रारी गोर गरीब जनतेच्या वाढलेल्या दिसतात. अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे शेती हेच उदरनिर्वाहाचे साधन आहे. त्यांना त्यांच्या जमिनी संपादन करतांना शासनातर्फे व उद्योजक व्यावसायिकांतर्फे पोटापाण्यासाठी कोणतेही साधन उपलब्ध करून न देता त्यांच्या जमिनी सरकार एम. आय. डी. सी. सेज साठी हिसकावून घेत आहेत. सिडकोमुळे शेतकऱ्यांची जी गत झाली त्याची पुनरावृत्ती होऊ नये, असे या देशातील शेतकरी वर्गाला वाटत आहे. आज समाजातील कष्टकरी वर्गातून स्पेशल इकॉनॉमिक झोन्सच्या उभारणीचा मार्ग पूर्णपणे घातक असल्याचे इशारे देण्यात येत आहेत. शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी हिरावून घेण्याच्या प्रयत्नांबद्दल नापसंती व्यक्त करतांना शेतकऱ्यांच्या हिताला सर्वाधिक प्राधान्य देण्याची गरज प्रतिपादन केली जात आहे. बळीराजाचा बळी देऊन कोण वैभवसंपन्न व लाभांचे दावेदार ठरणार ? हा कृषी संस्कृतीचा विनाश म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेला धोक्याचे इशारे आहेत.[१२] म्हणजेच देशाच्या प्रगतीला व विकासाला विरोध नसून `मुठभरांच्या विकासासाठी बहुजनांच्या हिताचा बळी घेणे हे समीकरण योग्य नाही. धरणाच्या माध्यमातून सुध्दा फारच थोड्या शेतकऱ्यांकडे सुबत्ता आली आहे. काही ठिकाणी तर धरण असूनही पाण्याचा थेंबही आला नसल्याचे आढळते. तेव्हा अर्थशास्त्रीय व व्यावहारिकदृष्टया विकास म्हणजे काय याची मांडणी न करताच विकास झाला असे सांगितले जाते. म्हणून या विकासाबाबतच्या फसव्या प्रचारावर विश्वास ठेवणे योग्य नाही. औद्योगिक विकासासाठी पंचवीस ते तीस हजार रूपये एकर दराने शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जातात व त्या विकसित करून २५ ते ३० लाख रूपये दराने विकल्या जातात. या व्यवहारात ज्यांची मुळ जमीन आहे त्या शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडत नाही. ही विषम विकासाची समाज व्यवस्था शेतकऱ्यांच्या हिताची नाही.

सेझ धोरणाचा भारतीय शेतकऱ्यांवरील होत असलेला दुष्परिणाम लक्षात घेऊन याचा पुनर्विचार करावा व तोवर नवीन सेझच्या मंजूरीला स्थगिती द्यावी अशी स्पष्ट शिफारस करणे

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli



Scanned with OKEN Scanner

 ISBN- 978-93-83672-75-2

केली. केंद्र शासनाने नेमलेल्या लँड रिफॉर्म कमिटीने तर सेझ कायदाच रद्द करावा अशी शिफारस केली. परंतु या सर्व लोकशाही यंत्रणांचे म्हणणे बासनात गुंडाळून सेझची घोडदौड चालू राहिली. आतापर्यंत देशात १०६८ सेझ मंजूर झाले आहेत. सेझच्याच धर्तीवर आणखी तीन नवी धोरणे येऊ घातली आहेत. त्यापैकी पहिले आहे नॅशनल मॅन्युफॅक्चरिंग व इन्व्हेस्टमेंट झोन, दुसरे दिल्ली, मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर आणि तिसरे पेट्रोकेमिकल्स पेट्रोलियम इन्व्हेस्टमेंट रिजन. यापैकी मॅन्युफॅक्चरिंग झोनचे धोरण पारित झाल्याबरोबर दोनच महिन्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केले. दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर सहा राज्यातून जाणार आहे व त्याचे टप्पे निश्चित झाले आहेत. त्यात ११ गुंतवणूक क्षेत्रे (इन्व्हेस्टमेंट रिजन) व १३ औद्योगिक विभाग (इंडस्ट्रीयल एरिया) समाविष्ट आहेत. एक गुंतवणूक क्षेत्र किमान २०० चौ. कि. मी. म्हणजे २०,००० हेक्टरचे तर एक औद्योगिक विभाग किमान १०० चौ. कि. मी.चा असणार आहे. यामध्ये ऊर्जा प्रकल्प, लॉजिस्टीक पार्क, बंदरे, विमानतळ, सेझ, औद्योगिक पार्क, नॉलेज सिटी, टाऊनशिप, आय. टी. हब इत्यादी प्रकल्प असतील, सरकारचा दावा आहे की, या प्रकल्पामुळे रोजगार दुप्पट, औद्योगिक उत्पादन तिप्पट व निर्यात चौपटीने वाढेल मात्र या पटयातील १८० दशलक्ष लोकांपैकी किती जणांच्या जमिनी जातील, किती रोजगार संपतील, शेतात काम करणारा शेतमजूर या कंपन्यांमध्ये काम करण्यास पात्र असेल काय ? याचा उल्लेख कुठेही केलेला नाही. महाराष्ट्र राज्य यामध्ये आघाडीवर असून येथील १६६ सेझ या पट्टयात येणार आहेत. नाशिक, सिन्नर दिघी पोर्ट, कोल्हापूरचा हुपरी, सिल्व्हर झोन, धुळयातील नरडाणा, नाशिकमधील विंचुर व सांगली तसेच बुटी बोरी, नागपूर अंबरनाथ पुणे येथे त्यातील टप्पे पाडले गेले आहेत.

सेझ ज्या सूत्रावर आधारित आहे ती सारी सूत्रे या कॉरिडॉरला लागू आहेत. म्हणजे २००५ नंतर १० वर्ष संपूर्ण कर सवलत, कामगार व पर्यावरण कायद्यातून ढील, स्थानिक स्वराज्य संस्था बरखास्त करून विशेष प्राधिकरण जे खाजगी कंपन्यांच्या प्रतिनिधींसह बनविण्याचा हेतू आहे. त्यांना सर्वाधिकार, जमीन, पाणी व संसाधनावर अधिकार इ. या कॉरिडॉरचे काम पाहण्यासाठी दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. ही कंपनी स्थापन करण्यात आली आहे. त्यात ४९ % गुंतवणूक सरकारी तर ५१ % खाजगी आहे. या कंपनीला स्पेशल पर्पझ व्हेईकल मानण्यात आले आहे व त्यांना कॉरिडॉरच्या सर्व बाबींवर निर्णय घेण्याचे अधिकार आहेत. या कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्समध्ये पाच सरकारी अधिकारी तर उर्वरित पाच खाजगी कंपन्यांचे प्रतिनिधी असतील. या कॉरिडॉरमधील नगरपालिका, जिल्हा परिषद, ग्रामपंचायती यांचे अधिकार या नव्या यंत्रणेकडे आणून या संस्था सरकारी बाबू व खाजगी कंपन्यांच्या कब्जात



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli
Scanned with OKEN Scanner

ISBN- 978-93-83672-75-2

देण्याचा प्रयत्न केला गेला.[१३] यामुळे लोकप्रतिनिधींच्या लोकशाही यंत्रणांना या नव्या विकास आराखड्यात थारा नाही. चार लाख पन्नास हजार कोटींची गुंतवणूक या कॉरिडॉरमध्ये अपेक्षित आहे. त्यामध्ये जपान सरकार बरोबर करार या आधीच झाले आहेत. नॅशनल मॅन्युफॅक्चरिंग झोनचे धोरण यालाच पुरक आहे. त्यातही स्पेशल पर्पज व्हेईकल ही कंपनी बाबुशाहीची यंत्रणा आहे. त्या धोरणाची विशेष बाब म्हणजे जंगल जमीन औद्योगिकीकरणासाठी खुली करण्याचे सुतोवाच त्यात आहे. मात्र त्यासाठी संबंधित उद्योजक विकासकांना पर्यायी वनीकरणासाठी जमिनीची व्यवस्था करावी लागेल. अर्थातच ती जमीन शोधण्याची जबाबदारी राज्य शासनावर आहे.

## निष्कर्ष

१) जागतिकीकरणामुळे भारतातील कृषि, शिक्षण, विज्ञान, औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्र यामध्ये परकीय गुंतवणूकीस सुरूवात झाली. याचा सर्वाधिक परीणाम कृषी क्षेत्रावर झाला आहे.

२) डंकेल प्रस्ताव मान्य केल्याने देशाच्या प्रत्येक अर्थसंकल्पात शेती, जलसिंचन, ग्रामीण विकास आणि खतावरील अनुदाने या सर्व बाबींवरील जी. डी. पी. च्या प्रमाणातील एकूण खर्चात (योजनांतर्गत आणि योजनाबाह्य) सातत्याने घट झालेली दिसून येते. एकूणच या सर्व गॅट कराराच्या जाचक अटींमुळे भारतीय शेतकरी पूर्णतः गुलामगिरीकडे लोटला जात असल्याचे दिसते.

३) विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी भांडवलदारांच्या घशात घालण्याचा डाव राजरोस खेळला जात आहे.

४) भारतीय शेतकरी हा जागतिक बाजारपेठेतील अमानुष स्पर्धेला बळी पडला आहे.

५) शेतकऱ्यांच्या आतापर्यंत झालेल्या आत्महत्या व यापुढे होणाऱ्या आत्महत्यांना शासनाची धोरणेच जबाबदार आहेत

## सारांश

१९९१ मध्ये भारताने नव आर्थिक धोरण स्वीकारले. नव्या आर्थिक धोरणानुसार भारतात जागतिकीकरण व उदारीकरणाला सुरूवात झाली. या काळात कृषी क्षेत्राची पीछेहाट झाली. नवीन आर्थिक धोरणांमुळे आयात निर्यात धोरणात बदल झाला. एका बाजूने कृषी खर्चात वाढ झाली तर दुसऱ्या बाजूने कृषी मालाच्या किंमती घसरल्या. एकूणच शेतीमालांच्या बाजार भावापेक्षा उत्पादन खर्च वाढला. शेती व्यवसाय तोटयाचा झाला. कृषी क्षेत्रातील गुतवणूक झपाटयाने कमी झाली आहे.आर्थिक संस्थापासून होणारा कर्जपुरवठा कमी झाल्याने शेतीच्या विकासाची गती खुंटली.



Shivaji College Hingoli
PRINCIPAL
Shivaji College
Hingoli Dist. Hingoli
Scanned with OKEN Scanner

 ISBN 978 93 83672 75 2

भारतात कृषी मालाचे प्रचंड उत्पादन होऊनही भांडवलदार व व्यापाऱ्यांच्या दबावामुळे कृषी मालाची आयात केली जाते. ही आयात प्रामुख्याने कृषी मालाला मोठ्या प्रमाणात अनुदान देणाऱ्या व दर हेक्टरी अधिक उत्पादन घेणाऱ्या विकसित देशांतून होत आहे. त्यामुळे अशा देशामधून आयात होणारा माल भारतीय बाजारपेठांमध्ये स्वस्त दरामध्ये विकला जात आहे. त्यांच्यासमोर भारतीय शेतकरी टिकू शकत नाहीत. त्यामुळे प्रत्येक वर्षी शेती करणारा शेतकरी शेतमालाला भाव नसल्याने आतबट्याची शेती करत आहे. दरवर्षी आतबट्याची शेती केल्याने शेतकरी कर्जात बुडू लागला व आत्महत्यांचा मार्ग पत्करू लागला. हा सर्व जागतिकीकरणाचा परिणाम आहे.

## संदर्भसुची


१) खडसे,भा.की.,( २००७),समाजशास्त्र, मुंबई, हिमालया बुक्स प्रा. लि.प्रथमावृत्ती, २२४

२) खडसे,भा.की.,( २००७),समाजशास्त्र, मुंबई, हिमालया बुक्स प्रा. लि.प्रथमावृत्ती, १२५

३) दुभाषी, पद्माकर.,(२००६),जागतिकीकरण,उदारीकरणआणिअर्थकारण,पुणे, श्रीविद्या प्रकाशन,९

४) दुभाषी, पद्माकर.,(२००६),जागतिकीकरण,उदारीकरणआणिअर्थकारण,पुणे, श्रीविद्या प्रकाशन,१०

५) मोरे, विठ्ठल., व संपादक मंडळ.,( २००२),विचारमंथन `जागतिकीकरण` महाराष्ट्र राज्यशास्त्र व ोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका, फेब्रुवारी अंक पहिला,२४

६) कराडे,जगन.,(संपादक),(२००८),जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, पुणे,डायमंड पब्लीकेशन,९८

७) कराडे,जगन.,(संपादक),(२००८),जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, पुणे,डायमंड पब्लीकेशन,१०१

८) दुभाषी, पद्माकर.,(२००६),जागतिकीकरण,उदारीकरणआणिअर्थकारण,पुणे, श्रीविद्या प्रकाशन,६५

९) दुभाषी, पद्माकर.,(२००६),जागतिकीकरण,उदारीकरणआणिअर्थकारण,पुणे, श्रीविद्या प्रकाशन,६६

१०) कराडे,जगन.,(संपादक),(२००८),जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, पुणे,डायमंड पब्लीकेशन,१०३

११) कराडे,जगन.,(संपादक),(२००८),जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, पुणे,डायमंड पब्लीकेशन,१११

१२) मोकाशी,मधुकर.,(२००९),ग्रामीण-दलित साहित्य चळवळ आणि समीक्षा,पुणे, स्नेहवर्धन प्रकाशन, १०३

१३) http://www.SEZ.com




Scanned with OKEN Scanner